

त्या फूलांच्या आजूबाजूला उडतात. त्या मध बनविण्यासाठी फूलांमधून रस गोळा करतात. जेव्हा कोणतीही एक माशी रस असलेले फूल शोधून घेते तेव्हा दुसऱ्या मधमाश्यांना सांगण्यासाठी ती विशिष्ट प्रकारचे नृत्य करते. कामगार माश्या मध पोळ्यासाठी महत्त्वाच्या आहेत. कामगार माश्यां शिवाय मधपोळे किंवा रसाचा संग्रह शक्य नाही. मधपोळ्यात सर्व मधमाश्या उपाशी पोटी जातात.



- मधमाश्यांसारखे इतर कोणते जिवजंतू आहेत, जे समूहात राहतात ?

मुंग्या मधमाश्यांप्रमाणे एकत्र समूहात राहतात आणि काम करतात. राणी मुंगी अंडी देते, शिपाई मुंग्या वारूळाचे रक्षण आणि देखरेख करतात. कामगार मुंग्या नेहमी खाण्याचे शोधण्यात आणि त्याला वारूळापर्यंत पोचविण्यात व्यस्त असतात. उधई आणि भूंगे पण ह्याच रितीने राहतात.



- तुम्ही पाहिले आहे का मुंग्या कुठे राहतात ?

- खाण्याच्या कोणकोणत्या वस्तूंजवळ मुंग्या जमा होतात ?


- मुंग्यांची रांग पहा. तिचा रंग कोणता आहे ?

- तुम्हाला कधी मुंगी चावली आहे का ? कशी मुंगी होती – काळी की लाल, लहान की मोठी ?

- जेव्हा तुम्ही भूईमूंगाच्या शेंगा खातात, त्याची टरफले कदाचित तुम्ही फेकून देतात त्या टरफलांचा उपयोग करून काही जिवजंतू बनविण्याचा प्रयत्न करा. त्यांना रंग देण्याचे विसरू नका.



# प्रकरण ६
# रियाचा प्रवास



रिया आणि तिची मैत्रिण जिया खूपच उत्साहित होत्या. त्या ट्रेनने प्रवास करून वापी जाणार होत्या. वेकेशन असल्यामुळे रिया तिच्या मामाच्या घरी जाणार होती. आणि जिया कुटुंबासोबत दमण फिरायला जाणार होती.

दोन्ही कुटुंबाचे सोबत जाण्याचे नक्की झाल्यावर रियाचे वडील दोन्ही कुटुंबासाठी पंधरा दिवस अगोदरच रेल्वेच्या तिकीटाचे बुकिंग करून आले होते.

त्यांच्या प्रवासाला फक्त दोन दिवस राहिले होते. तेव्हा जिया खूप आजारी पडली. डॉक्टरांनी तिला आराम करण्यास सांगितले होते. त्यामुळे जियाच्या कुटुंबाला त्यांचे तिकीट रद्द करावे लागले. दोन्ही मैत्रिणी खूप दु:खी होत्या. कारण की त्यांनी प्रवासा दरम्यान काय करायचे त्याचे आयोजन केले होते. पण जिया येणार नाही म्हणून रिया निराश झाली होती.

जिया म्हणाली मला एक युक्ती सूचली आहे. ती रियाला म्हणाली तू निराश होऊ नकोस. तू तुझ्या प्रवासाविषयी सर्व एका डायरीत लिही आणि मोबाईल मध्ये फोटो आणि विडिओ पण घे. तू जेव्हा परत येशील तेव्हा मी तुझी डायरी वाचेल आणि फोटो व विडियो पण पाहिल.

रिया तिच्या घरी गेली. एक नोटबुक आणि पेन शोधून तिच्या पिशवीत ठेवला.



### विचार करा आणि लिहा :

- तुम्ही कोणकोणत्या वाहनांमध्ये प्रवास केला आहे ?

  ______________________________

  ______________________________

- आजारी अवस्थेत जियाने प्रवास केला असता तर काय समस्या झाली असती ?

  ______________________________

  ______________________________



२८ मे

- **रियाची डायरी :**



२०:५५



आज पौर्णिमेचा दिवस होता. आम्ही सायंकाळचे जेवण करून रिक्षेत बसून गांधीधाम रेल्वे स्टेशनवर पोहचलो. थोड्याच वेळात ट्रेन प्लॅटफॉर्मवर येऊन उभी राहिली. आम्ही पाहिले तर ट्रेनमध्ये प्रवासी बसलेले होते. ट्रेन संध्याकाळी ७:५० ला कच्छ जिल्हयाच्या मुख्य केन्द्र भूजहून जात होती. आमच्या ट्रेनचे नाव 'कच्छ एक्सप्रेस' होते.

जेव्हा आम्ही आमच्या डब्या जवळ गेलो तेव्हा खूपच समस्या होती. एकाच दरवाजामधून प्रवासी उतरत होते आणि दुसरे स्वत:चा सामान आत ठेवून चढत होते. थोडे धक्का-बुक्की सारखे वाटल्यावर पप्पा म्हणाले, ''ट्रेन येथे पंधरा-वीस मिनिट उभी राहिल म्हणून आपण शांततेने चढूया. घाई करू नका.''

आम्ही आमच्या डब्यात येऊन आमची बैठक (जागा) शोधून सामान योग्य जागेवर ठेवला. वेळ झाल्यावर ट्रेन सुरू झाली तोपर्यंत इतर प्रवासी पण स्वत:ची बैठक शोधून बसले. मला आणि आईला खिडकीजवळ बैठक मिळाली होती. पप्पा आणि हिमाक्षला मधली बैठक मिळाली होती. आमच्या सोबत दुसरे एक कुटुंब पण डब्यात होते. ते पुढच्या स्टेशन पासून बसले असतील असे वाटते. त्यांच्या सोबत आमच्या वयाची दोन बालके पण होती. त्यांना दोन बैठक वरच्या आणि दोन बैठक बाजुच्या वर-खाली मिळाल्या होत्या.

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांना आवश्यक वाटेल त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवासाच्या वेळी घेण्याची सावधानी आणि तिकीटाचे महत्त्व समजवावे.



थोड्या वेळेनंतर तिकीट तपासण्यासाठी तिकिट चेकर आला. त्यांनी आमचे तिकीट तपासून खात्री केली की आम्ही आमच्या योग्य बैठकीवर बसलो आहोत की नाही.

- रियाच्या वडीलांनी ट्रेनच्या डब्यात शांततेने चढण्यास का सांगितले असेल ?

- तुम्ही प्रवास करतांना तिकीट तपासणाऱ्यास कशा प्रकारे ओळखाल ?

- तिकिट तपासणारा तिकिटामध्ये कोणती माहिती तपासून खात्री करतो ते तुमच्या शिक्षकांजवळून समजा.

२२:१५






आमची ट्रेन एखादा तास चालली असेल तेथे स्टेशन आले. आणि ट्रेन उभी राहिली. मी खिडकीतून पाहिले तर तेथे सामाख्याली जंक्शन लिहिलेले होते. मी वडीलांना विचारले या स्टेशनच्या

नावा मागे जंक्शन का लिहिलेले आहे ? वडिलांनी मला समजविले की, ज्या रेल्वे स्टेशनहून पुढे जाण्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक रेल्वेमार्ग वेगळे होत असतील तशा रेल्वे स्टेशनला 'जंक्शन' असे म्हणतात. या स्टेशनपासून दोन रेल्वेमार्ग वेगळे होत आहे. आपली ट्रेन ज्या मार्गावरून जाणार आहे तो अहमदाबादकडील मार्ग आणि दुसरा मार्ग पालनपूरकडे जाईल.

दोन तीन मिनिटानंतर ट्रेन सुरू झाली पुढे दोन मार्ग वेगळे पडत होते. ते वडीलांनी मला खिडकीमधून दाखविले.



तेथून आमची ट्रेन थोडी पुढे गेली माझी नजर खिडकी बाहेरच होती. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात मोकळ्या मैदानात पांढरी चादर टाकली आहे असे दूर दूर पर्यंत वाटत होते. वडीलांनी मला सांगितले की हे कच्छचे लहान रण आहे. आणि जे पांढऱ्या चादरी सारखे दिसत आहे तो जमिनीवर साचलेला मीठाचा थर आहे या विस्तारात अगरिया मीठाचा आगार बनवून मीठ बनवितात तेथे तर मीठाचे मोठे मोठे ढीग पहावयास मिळाले.



ट्रेन वेगाने पुढे जात होती. थोड दूर चंद्राच्या कमी प्रकाशात पूला सारखे दिसत होते त्यावरून वाहनांचे लाईट दिसत होते. आमची ट्रेन त्यावेळी पुलावरून जात होती. मी वडीलांना विचारले की हा कोणता पूल आहे ? त्यांनी सांगितले की हा 'सूरजबारी पूल आहे' ज्याला कच्छचे प्रवेशद्वार पण

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना रेल्वे जंक्शन तसेच रण व मीठाच्या शेती बाबत आधिक माहिती समजवावी.

म्हणतात. त्यांनी हे पण सांगितले की, जेव्हा हा पूल नव्हता तेव्हा अहमदाबादकडे जाणाऱ्या सर्वच ट्रेन पालनपूर वरून अहमदाबाद जात होत्या, ज्यात खूप वेळ जायचा.

मी लगेच वडीलांना विचारले, ''आधी आपण जे दोन रेल्वेमार्ग वेगळे पडतांना पाहिले त्यात पालनपूर कडील मार्ग होता तेथूनच ना ! वडिलांनी सांगितले ''हो तेथूनच ट्रेन जात होती.''

रात्रीचे अकरा वाजले म्हणून वडिलांनी झोपायला सांगितले. आईने आम्हाला आमच्या जागेवर चादर पसरवून दिली. डब्यात इतर प्रवासीसुद्धा झोपण्याची तयारी करीत होते. ट्रेनमध्ये टॉयलेटची व्यवस्था सुद्धा होती. मी आई सोबत टॉयलेटला जाऊन आली आणि झोपून गेली.

- तुम्ही कधी ट्रेनने प्रवास केला आहे का ? जर हो, तर कुठून कुठपर्यंत ?

- ट्रेन मध्ये कोणकोणत्या सुविधा असतात ? त्याची माहिती लिहा.



मी झोपण्याचा प्रयत्न केला पण ट्रेनच्या आवाजाने झोप येत नव्हती. आमच्या डब्यात दुसरे कुटुंब होते. त्यात माझ्या वयाची मुलगी होती. तिला पण माझ्या सारखी झोप येत नव्हती आम्ही दोघांनी थोड्या गप्पा मारल्या. तिचे नाव फियोना होते. तिच्याजवळ थोडी गोष्टीची पुस्तके होती मी पण तिच्याजवळून एक

**शिक्षकांसाठी :** ट्रेनमध्ये कोणकोणत्या सुविधा असतात. त्याची माहिती आणि त्याचा उपयोग काश्यारितीने करावा त्याची समज विद्यार्थ्यांना द्यावी.

पुस्तक घेऊन वाचन चालू केले. वाचता वाचता मला केंव्हा झोप आली समजलेच नाही.



अचानक माझे डोळे उघडले. खिडकीमधून बाहेरील लाइटाचा प्रकाश येत होता. मी उठून बसल्यावर पाहिले तर कोणतेतरी मोठे शहर आले आहे असे वाटत होते. ट्रेन पसार होत होती. चारही बांजूनी प्रकाशामुळे शहर सुंदर वाटत होते. असे सुंदर दृश्य मी माझ्या गांधीधाम मध्ये कधीही पाहिले नव्हते. चारीबाजूंनी अनेक मजली घरे आणि सूमसाम वातावरणात ट्रेन सडकमार्गाच्या पूला खालून, तर कधी फाटक असलेल्या मार्गामधून पसार होत होती. आईचा मोबाईल घेऊन मी रात्रीच्या या सुंदर दृश्यांचे फोटो आणि व्हिडीओ घेतले. ते पाहण्याची खूप मजा येईल.



०२:३०


आमची ट्रेन एका मोठ्या स्टेशनवर येऊन उभी राहिली. वडील पण जागे झाले.त्यांनी सांगितले की अहमदाबाद येऊन गेले. तेथे तर विविध वस्तू विकणाऱ्या फेरीवाल्याच्या




आवाजाने वातावरण घोंगाट युक्त झाले. 'चहा गरम चहा', 'गरमा गरम भजिया', 'पूरी शाक', 'थंड पाण्याची बॉटल', 'वडापाव... वडापाव', केळी, चिक्कू, सफरचंद, सारखे आवाज ऐकू येऊ लागले. वडीलांनी सागितले की, ट्रेन येथे वीस-पंचवीस मिनिट उभी राहिल. वडील पाण्याची बॉटल भरण्यासाठी खाली उतरले. मी पण त्यांच्या सोबत खाली उतरली.



प्लॅटफॉर्मवर खूपच गर्दी होती.प्रवासी फेरीवाल्यांजवळून खरेदी करीत होते. दुसऱ्या अनेक ट्रेन पण उभ्या होत्या. लाल रंगाची कपडे घातलेली माणसे सामान उचलून धावपळ करीत होते.माईकमध्ये आवश्यक सूचना देण्यात येत होत्या. कित्येक प्रवासी स्वत:च्या ट्रेनची वाट पाहत बसले होते. मला तर हे सर्व पाहण्याची खूप मजा आली. आम्ही पण फेरीवाल्याजवळून केळी आणि चिकू घेऊन डब्यात बसलो.



३:४५

वेळ झाल्यावर ट्रेन निघाली. आम्ही केळी आणि चिकू खाल्ल्यानंतर मी टॉयलेटला जाऊन आली. आता झोप येत नव्हती माझ्याजवळ सापसीडीच्या खेळाचा बोर्ड आणि खेळण्याचे पासे होते. मी, हिमाक्ष आणि फियोनाने थोडा वेळ सापसीडीचा खेळ खेळला. एवढयात नडियाद स्टेशन आले. जेथे फियोनाला उतरायचे होते. फियोना आम्हाला आवजो (पून्हा भेटूया) सांगून उतरली नंतर मी आणि हिमाक्ष झोपून गेलो.

- तुम्ही कधी रात्रीच्या वेळी रेल्वेमार्ग किंवा सडकमार्गाने प्रवास केला आहे का ? तुम्ही त्या वेळी रस्त्यात काय काय पाहिले त्याची माहिती लिहा.

- रियाने चालू ट्रेनमधून अहमदाबादमध्ये काय काय पाहिले ते लिहा.

**शिक्षकांसाठी :** रेल्वे स्टेशनवरील सुविधा, एका प्लॅटफॉर्म वरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाण्याची व्यवस्था तसेच घेण्यासारखी आवश्यक सावधानी व माईकमध्ये देण्यात येणाऱ्या सूचना विषयी विशेष माहिती द्यावी.

- तुम्ही प्रवास करताना स्टेशनवरील फेरीवाल्या जवळून खरेदी केली आहे का ? जर हो, तर त्याची यादी तयार करा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

- अहमदाबाद प्लॅटफॉर्मवर रियाने काय काय पाहिले ?

- अहमदाबाद प्लॅटफॉर्मवर रियाला कोणकोणते आवाज ऐकायला मिळाले ?

**शिक्षकांसाठी :** बालकांना वर्गखंडात सापसीडी, लुडो, अहमदाबाद सारखे खेळ खेळवा.



# प्रकरण ७
# रियाची ट्रेन उशीरा आली

**२९ मे**




०५:००

मी जागे झाली. आमची ट्रेन कोणत्यातरी प्लॅटफॉर्मवर उभी होती. मी बसून खिडकीतून पाहिले तर समोरच्या भिंतीवरील घड्याळामध्ये सकाळचे पांच वाजेचा वेळ दिसत होता. बाजूला एका खांब्यावर गोल पाटीवर वडोदरा जंक्शन लिहिलेले होते. भाऊ अजून झोपलेला होता.

माईकमध्ये सूचना देण्यात येत होती की वडोदराहून सुरत, वलसाड, वापी, मुंबईकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व ट्रेन दोन तास उशीरा येतील. वडीलांनी सांगितले तुम्ही ब्रश करून घ्या. तोपर्यंत मी चहा घेऊन येतो. आम्ही सकाळच्या प्रात:क्रिया आटोपल्या. एवढ्यात पप्पा चहा घेऊन आले. आणि मम्मीने थेपला, खाखरा आणि बिस्किट नास्त्यासाठी काढले. आम्ही चहा–नास्ता केला. तोपर्यंत उजेड पडला होता.



अजून ट्रेन निघण्यास खूप वेळ होता. पप्पा म्हणाले की चला तुम्हाला रेल्वे स्टेशनच्या सुविधा दाखवितो. मी आणि माझा भाऊ पप्पा सोबत ट्रेनमधून खाली उतरलो.



पप्पांनी आम्हाला तिकीट खिडकी, तिकीट चेकरची रूम, प्रतीक्षाखंड, पार्सलरूम, टॉयलेट, बाथरूम, पिण्याच्या पाण्याची सुविधा, चा-नास्त्याची कॅन्टीन सारख्या सुविधांची स्थळे दाखविली.

एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाणाऱ्या पायऱ्या असलेल्या पूलावरून आम्ही पाहिले तर स्टेशनवर खूप ट्रेन उभ्या होत्या. रेल्वेचे कर्मचारी पाईपद्वारे ट्रेनच्या डब्ब्यांमध्ये पाणी भरतांना आणि ट्रेनची स्वच्छता करतांना पहावयास मिळाले. कित्येक सफाई कामगार रूळाच्या आजूबाजूची स्वच्छता करतांना पहावयास मिळाले. स्टेशनवर फिरतांना वेळ कुठे निघून गेला कळालेच नाही. मला रेल्वेच्या सुविधांविषयी खूपच माहिती मिळाली. खरोखर खूपच मजा आली.मी कित्येक सुविधांचे फोटो आणि व्हिडिओ पप्पांच्या मोबाईलमध्ये घेतले आहे.

- तुम्ही विचार करा की रियाची ट्रेन वडोदरा स्टेशनहून दोन तास उशीरा का निघाली असेल ?

- रियाने स्टेशनवर कोणकोणत्या स्थळांची मुलाखात घेतली ?





**२९ मे**

०७:००

आता माईकमध्ये सूचना देण्यात आली, आमची ट्रेन दोन मिनिटांनी वडोदरा स्टेशनवरून निघेल. आम्ही पुन्हा आमच्या डब्यात येऊन बसलो. ट्रेन निघाली.....

पहाट झाली होती. बाहेरचे वातावरण खूपच सुंदर वाटत होते.

आमची ट्रेन सडकमार्गाच्या बंद फाटका जवळून पसार होत होती तिथे लोक फाटकाच्या दोन्ही बाजूला ट्रेन पसार होण्याची वाट पाहत उभे होते. तेथे बस, कार, रिक्षा, सायकल, स्कूटर, तसेच माल-सामान भरलेल्या ट्रक सारखी वाहने पण उभी होती. कित्येक लोक स्वत:ची वाहन बंद केल्याशिवाय उभे होते. ज्यामुळे तेथील वातावरण आवाज आणि धूरयुक्त झाले होते. कित्येक लोक फाटकच्या दांड्या खालून निघून रूळाजवळ येऊन उभे होते. खरोखर ते धोकेदायक होते.






त्याचवेळी आमच्या ट्रेनच्या बाजूमधून दुसरी ट्रेन पसार झाली. मी आणि हिमाक्षने त्या ट्रेनचे डब्बे मोजण्याचा प्रयत्न केला. परंतु दोन्ही ट्रेन खूपच वेगाने चालत होत्या. त्यामुळे डबे मोजू शकलो नाही.

- तुम्ही कधी रेल्वेफाटक जवळून गेला आहात का ? जर हो, तर फाटक बंद होते तेव्हा आणि फाटक उघडले तेव्हा तेथील हालचाल कशी होती ते विचार करून लिहा.

- रियाने फाटकाजवळ काय काय पाहिले ?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना रेल्वे फाटकाचे नियम समजवा तसेच फाटक ओलांडतांना घेण्याची सावधानी आणि ट्राफिकची सुरक्षा तसेच कर्तव्य बाबती विशेष समज द्यावी.





मी डोळे बंद करून खिडकीजवळ बसली होती. अचनाक ट्रेन चालण्याचा आवाज बदलला. खड, खड, खड .... मी माझे डोळे उघडले. अनुमान करा मी काय पाहिले असेल ? माझी ट्रेन एका मोठ्या नदीच्या पूलावरून जात होती. मम्मीने सांगितले हा नर्मदा नदीचा पूल आहे. ही नदी गुजरातची सर्वात मोठी नदी आहे. तिचे पाणी कालव्याद्वारे दूर दूरच्या विस्तारापर्यंत पोहचविण्यात आले आहे.

थोडे दूर दुसरे दोन पूल पण दिसत होते. त्यावरून लहान–मोठी वाहने जात होती. पप्पा म्हणाले की जो पूल तुम्ही पहात आहात त्याला गोल्डन ब्रिज असे म्हणतात. तो खूपच जूना आणि मजबूत पूल आहे. त्याच्या पुढे जो पूल दिसत आहे तो नर्मदा नदीवर नवा बांधलेला पूल आहे. तो भारतातील सर्वात मोठा कॅबल ब्रिज म्हणून ओळखला जातो.



उन्हाळा असून सुद्धा नदीत पाणी भरपूर होते. कित्येक मासेमार नावेत मासे पकडण्याचे जाळे पसरवून बसलेले पहावयास मिळाले. पूल लांब असल्याने हे सर्व पाहण्याची खूप मजा आली.

पप्पा म्हणाले की रात्री तुम्ही झोपले होते तेव्हा आपली ट्रेन साबरमती, वात्रक, महीसागर आणि विश्वामित्री सारख्या मोठ्या नदीच्या पूलावरून गेली होती. आता पुढे सुरत जवळ तापी नदीचा पूल येईल ते पहायला विसरू नका.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना नकाशाच्या मदतीने गुजरातच्या विविध नद्यांचा परिचय करवा तसेच सडकमार्ग आणि रेल्वेमार्ग मध्ये पुलाचे महत्त्व तसेच नद्यांच्या पाण्याचा संग्रहासाठी डॅम विषयी माहिती द्यावी.



बाहेरील दृश्य पाहण्याची खूपच मजा आली. नदी किनाराच्या विस्तारात हिरवे पीक असलेली शेती पहावयास मिळाली. कित्येक शेतांमध्ये केळीची पीके पहावयास मिळाली. चारीबाजूला हिरवेगार वृक्ष पण पहावयास मिळाले. वारापण खूप थंडगार येत होता. अशा थंड हवेचा अनुभव मला गांधीधाम मध्ये झाला नाही. आम्ही बाहेरचे वातावरण पाहण्यात मग्न होतो. तेव्हा मम्मीच्या मोबाईलमध्ये मामाचा फोन आला ते आम्हाला रेल्वे स्टेशनवर घ्यायला येणार होते. म्हणून आईने कळविले की आमची ट्रेन दोन तास उशिरा येणार आहे. म्हणून आम्ही ८:२५ मि. पोहचण्या ऐवजी आता १०:२५ मि. पोहचणार आहोत.

- तुम्ही पूल पाहिले आहेत का ? कोणकोणते ?

- तुमच्या विस्तारात कोण कोणत्या नद्या आहेत ? त्या नद्यांवर कोण कोणत्या ठिकाणी पूल बांधलेला आहे ते विचार करून लिहा.

- नदीवर पूल का बनवावे लागतात ते विचार करा आणि लिहा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना रेल्वेमार्गात येणारे डोंगराळ प्रदेशामधून जाणारा बोगदा (टनल) बनवून तयार केलेला रेल्वेमार्ग तसेच नदी-तलाव-सरोवर-दर्‍यांमधून जाणारा रेल्वेमार्गाच्या चित्रांद्वारे अधिक माहिती द्यावी.

- तुम्ही कधी पूलावरून गेले आहात का ? कोणत्या ?

- तुम्ही पूलाच्या आजूबाजूला काय पाहिले ?

- रियाची ट्रेन कोणकोणत्या नद्यांच्या पूलावरून गेली होती ?




०९:००



आमची ट्रेन एका मोठ्या शहरामधून जात होती. रस्त्यामध्ये मोठ–मोठे सडकमार्गाचे पूल पण येत होते. रेल्वेमार्गाच्या दोन्ही बाजूला मोठ–मोठ्या इमारती आणि बाजार दिसत होते. पप्पा म्हणाले की हे सूरत शहर आहे. हे शहर हीरा उद्योग आणि कापड उद्योगासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. अहमदाबाद नंतर गुजरातचे हे दुसऱ्या नंबरचे मोठे शहर आहे. स्टेशन आल्यावर ट्रेन उभी राहिली.

**शिक्षकांशाठी :** विद्यार्थ्यांना भारतातील विविध राज्ये आणि प्रदेशांच्या पोषाख, राहणीमान, बोली आणि त्यांच्या आहारा विषयी विशेष माहिती सांगा त्यांचे चित्र–चार्ट दाखवावे.

प्लॅटफॉर्मवर प्रवाशांची ये–जा खूप होती. येथे कुठे–कुठे वेगवेगळे पोषाख असलेले लोकं पण पहावयास मिळाली. कित्येक स्त्रीयांनी धोतर सारखी साडी नेसलेली होती.तर कित्येक पुरूषांनी लुंगी प्रमाणे पांढरे धोतर गुंडाळलेले होते. कित्येक लोकांची बोलीपण वेगवेगळी होती.

पप्पांनी सांगितले की येथे देशाच्या विविध राज्यातील लोक नोकरी–धंद्यासाठी स्थायी झालेले आहेत.



त्यामुळे येथे विविध प्रकारचा पोषाख असणारे लोक पहावयास मिळतात.

पप्पांनी सूतरफेणी आणि घारी आणली. जी सुरतची प्रख्यात मिठाई आहे. ट्रेन पांच मिनिट थांबल्यावर निघाली.

पप्पा म्हणाले की. आता नवसारी आणि वलसाड नंतर लगेच वापी येईल. आपल्याला वापी पोहचायला अजून एखादा तास लागेल.


मम्मीने मामाला फोन करून कळविले की आमची ट्रेन एक तासात वापी पोहचेल. आता वलसाडहून आमची ट्रेन निघाली. आम्ही आमचा सामान व्यवस्थित केला.



मला आणि हिमाक्षला मामाच्या घरी पोहचण्याचा आनंद होता. आमची ट्रेन आता वापी पोहचणार होती, जेथे आम्हाला उतरायचे होते.

मामाचा फोनपण आला की ते आम्हाला घेण्यासाठी स्टेशनवर पोहचले आहेत आमचा प्रवास लांब होता पण मी आणि हिमाक्षने खूप मजा केली.

मी माझे डायरी लिहिण्याचे बंद करते. मामाच्या घरी पोहचल्यावर बाकीचे लिहील.



२९ मे




१०:२५

- तुम्ही कोणकोणती शहरे पाहिली आहेत ? तेथे तुम्ही काय काय पाहिले ? ते विचार करून लिहा.

- तुम्ही कशा कशा प्रकारचा पोषाख घातलेल्या लोकांना पाहिले आहे ? विचार करा आणि लिहा.

- तुम्ही गुजराती बोली शिवाय कोण कोणती भाषा बोलणाऱ्या लोकांना ऐकले आहे ?

| | | |
|---|---|---|
| | | |

- रियाची ट्रेन कोण कोणत्या रेल्वे स्टेशनवरून गेली होती ?

- पृष्ठ ६२ वर दिलेल्या समयपत्रकावरून रियाची ट्रेन ज्या स्टेशनवरून गेली आणि येथे त्याचा उल्लेख झाला नसेल, तशा स्टेशनांची नावे लिहा.

- तुमच्या किंवा तुमच्या जवळपासच्या विस्तारातील गाव किंवा शहराचा प्रसिद्ध पदार्थ किंवा चिजवस्तूंची यादी बनवा.

  जसे की, सुरतची घारी, पाटणचा पटोळां

| गाव किंवा शहराचे नाव | प्रसिद्ध पदार्थ | प्रसिद्ध चीजवस्तू |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

- ट्रेनच्या डब्यात पाणी किंवा वीज कशाप्रकारे येत असेल ? चर्चा करा.
- अनुमान करा की तुम्ही ट्रेनच्या दीर्घ प्रवासाला जाणार आहेत, वेळ घालविण्यासाठी तुम्ही कोण कोणत्या वस्तू सोबत घेणार ?
- खाली दिलेल्या चित्रात दर्शविलेल्या सेवकांना ओळखा आणि त्यांची नावे लिहा. ते काय काम करतात, त्यांची चर्चा करा.






# प्रकरण ८

## रिया पोहचली मामाच्या घरी

**२९ मे रात्री**



१०:२५

ट्रेनच्या लांब यात्रेनंतर आम्ही वापी पोहचलो. मामाचे घर स्टेशनपासून जवळ असल्यामुळे मामा आम्हाला घेण्यास आला होता. मामा सोबत श्रील आणि आर्नव पण आले होते. ते माझ्या मामाची मुले होती. मला आणि हिमाक्षला पाहून ते खूपच आनंदित झाले. आम्ही एकमेकांना भेटलो.

आम्ही स्टेशनपासून दोन रिक्षा करून मामाच्या घरी पोहचलो. मला खूपच झोप येत होती. मी झोपून गेली. थोड्या वेळानंतर मम्मीने मला उठविले. मम्मी-पप्पा अंघोळ करून तयार झाले होते. नंतर आम्ही सर्वांनी सोबत बसून जेवण केले. मामा म्हणाले की तुम्ही सर्व थोडावेळ आराम करा मग आपण दमण फिरायला जाऊ.





आम्ही दमण जायला तयार झालो. मामाचे कुटुंब पण आमच्या सोबत येणार होते. आम्ही रिक्षेत बसून बस स्टँडवर पोहचलो. तेथून आम्ही बसमध्ये बसून दमणच्या जंपोर बीच पोहचलो.

बीचवर खूपच गर्दी होती. लोक सागर किनारी मजा करायला आले होते. कित्येक लोक होडीत बसून समुद्र किनारी फिरत होते. कोणी घोड्यावर तर कोणी ऊंटावर बसून फिरत होते. लहान लहान मुले समुद्रकिनारी रेतीची घरे बनवित होते. मला तर हे सर्व पाहून खूपच मजा आली. मी, हिमाक्ष, श्रील आणि आर्नव पण रेतीत घरे बनवायला बसलो. आम्हाला रेतीत खेळण्याची खूप मजा आली.





एवढ्यात मामा होडीचे तिकीट घेऊन आले. आम्ही होडीत बसून समुद्राचा प्रवास केला. अगोदर तर मला होडीत बसायची भिती वाटत होती.मी मम्मी जवळ बसली. समुद्राचा प्रवास करतांना खूप मजा आली. नंतर आम्ही घोडेसवारी आणि ऊंटसवारी पण केली. त्यानंतर आम्ही किनाऱ्यावर बसून नास्ता केला.



आता संध्याकाळ झाली होती. सूर्य समुद्राच्या पाण्यात बुडत आहे असे दिसत होते.आकाश रंगबेरंगी दिसत होते. आम्ही समुद्रकिनारी फोटो आणि व्हिडियो पण घेतले.

अंधार झाला. आम्ही मामाच्या घरी परत आलो.

माझा हा लांबचा प्रवास रसप्रद आणि अविस्मणीय झाला.

- मामाच्या घरी जाण्यासाठी रियाच्या कुटुंबाला का दोन रिक्षा कराव्या लागल्या असतील ? विचार करा आणि लिहा.

- तुम्ही कधी समुद्रकिनारी फिरायला गेले आहात का ? कोण कोणत्या ठिकाणी ?

- समुद्रकिनारी रियाने कशाची सवारी केली ?

- रियाच्या ट्रेनला गांधीधामहून वापी पोहचण्यासाठी किती तास लागले ?

**शिक्षकांसाठी :** वर्गखंडात विद्यार्थ्यांसोबत समुद्रकिनारी, नदीकिनारी, जत्रेत किंवा इतर पाहण्यासारख्या स्थळांविषयी चर्चा करा. तेथे कोण कोणत्या ठिकाणी तिकीट घ्यावी लागते, या जागेवर कोणती काळजी घ्यावी, काय खावे, काय खाऊ नये. या विषयी समज द्यावी.


- कोण कोणत्या वाहनांमध्ये प्रवास करण्यासाठी तिकीट खरेदी करावे लागते, त्यांची नावे द्या.

- अनेकवेळा आपल्याला एखाद्या ठिकाणी प्रवेश करण्यासाठी तिकीट घेण्याची गरज पडते. तुम्ही अशा जागेंविषयी विचार करून लिहा.



**इथे दिलेल्या ट्रेनच्या तिकीटाचे चित्र पहा. खालील माहिती तिकीटामधून शोधा आणि लिहा :**

- ट्रेन नंबर
- प्रवास सुरू होण्याची तारीख
- डबा आणि बैठक नंबर
- भाडे (तिकीटाचे रूपये)
- अंतर (किमीमध्ये)
- किती व्यक्तिंनी प्रवास केला ?
- हे तिकीट किती पुरुष आणि स्त्रियांसाठी आहे ?



पी.एन.आर.नं. PNR NO. | गाड़ी नं. TRAIN NO. | तिथि DATE | कि.मी. K.M. | वयस्क ADULT | बच्चे CHILD | 68250918

820-6449755 | 9037 | 24-12-2018 | 643 | 2 | 1 | /68250918

श्रेणी/CLASS

JOURNEY CUM RESERVATION TICKET

तक / से आरक्षण PRS-NDLS RESV. UPTO

2वाता बांदरा टर्मिनस रतलाम जं.

2A BANDRA TERMINUS RATLAM JN

DELHI PRS


| कोच COACH | सीट/बर्थ SEAT/BERTH | | लिंग SEX | आयु AGE | यात्रा अधिकार पत्र T.AUTHORITY | रियायत CONC. | आ.शु. R. FEE | स.शु. S. CH. | सु.अ. SF.CH. | वाऊचर रु. VOUCH.Rs. | कु. नकद रु. T.CASH Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A1 | 21 | LB | M | 39 | | | 75 | | | | 2578 |
| A1 | 23 | SL | F | 37 | | | | | | | |
| A1 | 22 | UB | M | 7 | | | | | | | |

Rs.TWO FIVE SEVEN EIGHT ONLY

I-TICKET/ NO CASH REFUNDS

(NEW TIME TABLE FROM 01-12-2018) AVADH EXPRESS BOARDING BDTS 24-12-2018

713 27-10-2018 14:36 RCT1 210 VIA BRC



- दुसरी कोणती माहिती तुम्ही तिकीटामधून शोधू शकतात ते लिहा.
  - 
  - 
  - 

रेल्वेचे वेळापत्रक प्रत्येक ट्रेनच्या मार्गा विषयी माहिती देते. याशिवाय स्टेशनवर, ट्रेन कोणत्या वेळी पोहचेल आणि कोणत्या वेळी स्टेशन सोडेल, कापलेल अंतर वगैरेची माहिती सांगते. आपण रेल्वे स्टेशनवरून रेल्वे समयपत्रक खरेदी करू शकतो.

रियाने प्रवास केलेल्या ट्रेनच्या मार्गाची माहिती वेळापत्रकात दिलेली आहे. त्याला काळजीपूर्वक पहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**19132 कच्छ एक्सप्रेस**

| क्रम | स्टेशनचे नाव | पोहचण्याची वेळ | निघण्याची वेळ | थांबा मिनिट | अंतर किमी | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भूज | ०० | १९ : ५० | ० | ०० | १ |
| २. | अंजार | २० : २४ | २० : २६ | २ | ४२ | १ |
| ३. | आदिपूर | २० : ३६ | २० : ३८ | २ | ४९ | १ |
| ४. | गांधीधाम | २० : ५५ | २१ : १५ | २० | ५८ | १ |
| ५. | भचाउ | २१ : ४६ | २१ : ४८ | २ | ९८ | १ |
| ६. | सामखियाळी | २२ : १३ | २२ : १५ | २ | १११ | १ |
| ७. | माळिया-मियाणा | २२ : ५० | २२ : ५२ | २ | १५२ | १ |
| ८. | हळवद | २३ : २९ | २३ : ३१ | २ | १९७ | १ |
| ९. | धांगध्रा | ०० : ०२ | ०० : ०४ | २ | २२८ | २ |
| १०. | विरमगाम | ०१ : १३ | ०१ : १५ | २ | २९४ | २ |
| ११. | अहमदाबाद | ०२ : ३५ | ०३ : ०० | २५ | ३५९ | २ |
| १२. | नडियाद | ०३ : ४५ | ०३ : ४७ | २ | ४०५ | २ |
| १३. | आणंद | ०४ : ०८ | ०४ : १० | २ | ४२३ | २ |
| १४. | वडोदरा | ०४ : ५५ | ०५ :०० | ५ | ४५९ | २ |
| १५. | भरूच | ०५ : ५१ | ०५ : ५३ | २ | ५२९ | २ |
| १६. | अंकलेश्वर | ०६ : ०२ | ०६ : ०४ | २ | ५३८ | २ |
| १७. | सुरत | ०७ : ०० | ०७ : ०५ | ५ | ५८८ | २ |
| १८. | नवसारी | ०७ : २६ | ०७ : २८ | २ | ६१७ | २ |
| १९. | वलसाड | ०८ : ०१ | ०८ : ०३ | २ | ६५६ | २ |
| २०. | वापी | ०८ : २५ | ०८ : २७ | २ | ६८० | २ |

- खालील स्थळांवर ट्रेन पोहचण्याचा वेळ लिहा :

  गांधीधाम : __________ अहमदाबाद : __________ सुरत : __________

- कोष्टकात दिलेल्या अशा स्टेशनच्या नावावर गोल करा जे रियाच्या डायरीत लिहिलेले आहे.
- ट्रेन कोणत्या स्टेशनवरून निघाली होती ? किती वाजता ?

  ______________________________

- ट्रेन भूजहून गांधीधाम पोहचे पर्यंत किती किलोमीटर आंतर कापले होते ?

  ______________________________

- प्रवासाच्या कोणत्या दिवशी ट्रेन वापी पोहचली ?

  ______________________________

- फियोना ट्रेनमधून उतरली त्यानंतर रियाला वापी पोहचायला किती वेळ लागला ?

  ______________________________

- फियोना आणि रियाने किती किलोमीटरचा प्रवास सोबत केला ?

  ______________________________

- रियाने ट्रेनद्वारे किती किमी प्रवास केला ?

  ______________________________

- तुम्हाला डायरी लिहायला आवडेल ?

  ______________________________

एक नोटबुक घ्या. तुम्ही आठवड्याच्या प्रत्येक दिवशी काय केले त्या विषयी लिहा. तुमचे विचार आणि आपुलकी पण लिहा. तुमच्या डायरीची मित्रांसोबत देवाण-घेवाण करून वाचा.

**शिक्षकांसाठी :** रेल्वेचे वेळापत्रक वर्गात आणावे. बालकांना वेळापत्रक कशारितीने वाचावे त्याचे मार्गदर्शन द्यावे. तुम्ही समयपत्रकाला भूगोल आणि गणिताची प्रवृत्ती करण्यासाठी एक साधन म्हणून उपयोग करू शकतात.




# प्रकरण ९
# बदलणारे कुटुंब


इथे कित्येक कुटुंबांची चित्रे आहेत. हे कुटुंबे किरण, सुमी आणि दिपालीचे आहेत. या चित्रांच्या आधारे विविध माहिती मिळवू या.

## किरणची गोष्ट

किरणच्या कुटुंबात खूपच उत्साह आहे. तिच्या लहान बहिणीचा जन्म झाला आहे. किरण आणि तिचा परिवार आनंदी आहे.









## चित्र पहा आणि लिहा :

- किरणच्या कुटुंबात आता किती सभासद झाले ?

## चला, चर्चा करू या :

किरणच्या कुटुंबात तिच्या लहान बहिणीचा जन्म झाला. आता तिच्या घरात कोण कोणत्या बाबतीत बदल होईल ?

- किरण तिचा दिवस कशा रितीने घालवेल ?
- तिच्या मम्मीला आता कोण कोणती कामे वाढतील ?
- घरात लहान बालक असेल तर कसे बदल पहावयास मिळतील ?

**शिक्षकांसाठी :** प्रत्येक बालकाला त्याच्या अनुभवांची देवाण-घेवाण करण्याची संधी द्या.



**तुम्हाला माहीत असतील,तशा कुटुंबामध्ये लहान बालक असेल तर त्याच्या विषयी माहिती मिळवून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- तुमच्या आजूबाजूला सर्वात लहान बालक कोणाच्या घरी आहे ?
- बालकाचा जन्म कधी झाला होता ?
- त्या बालकाचे वय किती आहे ?
- तुमचे त्याच्यासोबत काय नाते आहे ?
- बालकाचा जन्म कुठे झाला होता ?
- बालकाला दात आहेत का ?
- बालकाला काय खाऊ घालतात ?
- त्या बालकाचे चित्र काढा किंवा फोटोग्राफ चिकटवा.

## सुमीची गोष्ट

सुमीचे वडील सरकारी नोकरी करतात. त्यांना बढती मिळाली आणि इतर शहरांमध्ये बदली पण झाली. आता आपण सुमीच्या परिवारा विषयी पाहूया.



सुमीचे वडील ऑफिसमधून घरी आले. त्यांनी बढती आणि बदलीची गोष्ट केली. आता काय झाले असेल ? त्या विषयी पाहूया.




- सुमीच्या वडीलांची बदली झाली. आता नवीन जागेवर जाण्यासाठी ते कशी तयारी करतील ?

  सुमीच्या वडीलांसोबत नवीन स्थळी कोण कोण जाईल ? सुमी कशा शाळेत दाखल होईल ?

  - तुमच्या परिवारतील एखाद्या सभासदाला कामामुळे दुसऱ्या गावी किंवा शहरात जावे लागले आहे का ?
  - तुमच्या शाळेत शेवटी कोणी प्रवेश घेतला ?

- तुमच्या शाळेत दुसऱ्या गावाहून किंवा शहरामधून आलेल्या विद्यार्थ्यांविषयी नोंद करा.

| क्रम | विद्यार्थ्यांचे नाव | कुठून आला | कधी आला | त्याच्या शाळेचे नाव | त्याच्या शाळेत काय चांगले होते | येथील शाळेत त्याला काय नवीन वाटले ? |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

## दिपालीची गोष्ट :

दिपालीच्या घरी आज सर्व आनंदात आहेत. सर्वजण आनंद घेत आहेत. दिपालीच्या काकाच्या मुलाचे आज लग्न आहे. तुम्हीपण कित्येक लग्न पाहिले असतील. या लग्नाविषयीचे चित्रे पहा आणि त्यांच्या विषयी चर्चा करा.











## विचार करा आणि सांगा :

- दिपालीच्या काकाच्या मुलाचे लग्न झाले. आता दिपालीच्या घरात काय बदल होईल ?
- मुलगी सासरी जाते तेव्हा तिच्या (वडीलांच्या) घरी कसे परिवर्तन होईल ?

**तुमच्या आई आणि काकू सोबत चर्चा करा आणि विचारा.....**

- त्या लग्नाअगोदर कुठे राहत होत्या ?
- त्यावेळी त्यांच्या कुटुंबात कोण कोणते सभासद होते ?
- तुमच्या कुटुंबात शेवटी कोणाचे लग्न झाले आहे ?
- लग्नप्रसंगी जेवणात काय बनविले होते ?

## तुमच्या मित्रासोबत वार्तालाप करा आणि त्यांच्या कुटुंबामध्ये लग्न दरम्यान काय काय करण्यात येते ? त्या विषयी लिहा :

- वर आणि वधु कसे कपडे घालतात ?

________________________________

- लग्नात कसे गीत आणि नृत्ये करण्यात येतात ?

________________________________

- तुम्ही गेलेल्या लग्नप्रसंगात तुम्ही काय काय पाहिले ?

________________________________

आपण किरण, सुमी आणि दिपालीच्या कुटुंबामध्ये वेगवेगळ्या कारणांनी झालेले बदल पाहिले.

**या बदलासाठीची कारणे लिहा :**

- किरणच्या कुटुंबामध्ये ........

________________________________

________________________________

**हे पण कामाचे :** गुजरातमध्ये लग्न प्रसंगी विविध प्रकारची गीते, नृत्ये करण्यात येतात जसे की, उत्तर गुजरातमध्ये 'डोसलो नृत्य', अरवल्ली विस्तारात 'मोरियो नृत्य', 'झमकूडी गीत', 'लेझिम नृत्य', कन्या विदाई गीते, पांसली भरण्यास जातांना गायले जाणारे विविध गीते, 'रासगरबा', 'हूडो', 'सरजु' सारखी नृत्य-गीते पहावयास मिळतात.



- सुमीच्या कुटुंबामध्ये –

- दिपालीच्या कुटुंबामध्ये –

- कुटुंबामध्ये बदलाची या शिवायची कोणती कारणे असू शकतात ?

- तीन वडीलधाऱ्यांसोबत वार्तालाप करा. एक तुमच्या कुटुंबामधून, एक तुमच्या मित्राच्या कुटुंबामधून आणि एक तुमच्या शेजारील कुटुंबामधून त्यांना ही माहिती विचारा आणि कोष्टक पूर्ण करा.

| माहिती | तुमच्या कुटुंबात | मित्राचे कुटुंब | शेजाऱ्याचे कुटुंब |
|---|---|---|---|
| • कुटुंब इथे किती वर्षापासून राहत आहे ? | | | |
| • येथे येण्याअगोदर कुटुंब कोठे राहत होते ? | | | |
| • आज कुटुंबात किती सभासद आहेत ? | | | |
| • दहा वर्षा अगोदर कुटुंबात किती सभासद होते ? | | | |
| • कुटुंबात शेवटच्या दहा वर्षात बदलाची काय कारणे होती ? | | | |
| • तुम्ही या सर्व बदला विषयी काय अनुभव करतात ? | | | |

**शिक्षकांसाठी :** बदल हा जीवनाचा एक भाग आहे. तसे असून सुद्धा, बालकांवर परिवर्तनाचा गंभीर परिणाम होतो. या मुद्याची चर्चा करतांना ते लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

## माझे कुटुंब – काल – आज – उद्या....

सर्व कुटुंबामध्ये कोणतेही एक किंवा दुसऱ्या वेगवेगळ्या कारणांमुळे बदल घडतात. तुमच्या कुटुंबात काय बदल झाले आहे ?

जेव्हा तुमचे आजी आणि आजोबा लहान बालके होती तेव्हा तुमचे कुटुंब आज आहे तसेच होते का ? त्याची आजी–आजोबा सोबत चर्चा करा.

तुम्हाला सीतेच्या कुटुंबवृक्षाचे चित्र जे तुम्ही इयत्ता ३ मध्ये शिकलात ते आठवते का? तुम्हीपण तुमचे कुटुंबवृक्ष काढले असतील. चला गेल्या वर्षा प्रमाणे नोटबुकमध्ये कुटुंबवृक्ष काढूया.

- तुमचे आजी किंवा आजोबा तुमच्या वयाचे होते तेव्हा त्यांच्या कुटुंबात किती सभासद होते ? तुमच्या नोटबुक मध्ये त्यांच्या कुटुंबाचे वृक्ष काढा.
- तुम्ही स्वत:ला, तुमचा भाऊ, बहीण, आई किंवा वडीलांना कुटुंब–वृक्षात पाहू शकतात का?
- आता तुमच्या वर्तमान कुटुंबाचा वृक्ष तुमच्या नोटबुक मध्ये काढा.

आज तुमच्या कुटुंबात कोणकोणते सभासद आहेत ? तुमचे आजी–आजोबा कुठे आहेत ? या कुटुंबवृक्षात तुम्ही कुठे आहात ?



### चला, चर्चा करूया :

तुमचे आजी किंवा आजोबांच्या बालपणीचे कुटुंबवृक्ष तुमच्या आताच्या कुटुंबवृक्षापेक्षा कशारितीने वेगळे आहे.

**शाळेत परत जावूया...**

- तुम्ही शिकून काय होणार आहात ?

  ______________________________

- तुमच्या घरात सर्वात जास्त कोण शिकलेले आहे ?

  ______________________________

- तुमच्या घरात सर्वात कमी कोण शिकलेले आहे ?

  ______________________________



- **हे पण कामाचे :**

  लग्न करण्यासाठी सरकारने निश्चित वय नक्की केले आहे. या वया अगोदर लग्न केल्यास गुन्हा ठरतो, कारण की त्याला बाललग्न असे म्हणतात.

## शोधून काढा आणि लिहा :

- तुमच्या शेजारी असे कोणती बालके आहेत का ज्यांना शाळा सोडावी लागली आहे ? कशासाठी ?

- आता ते काय करतात ?

- हल्ली तुमच्या कुटुंबात कोणाचे लग्न झाले आहे का ? कोणाचे ?

- वर आणि वधुचे वय किती होते ?

- त्यांनी कशाप्रकारचे कपडे घातले होते ?

  वधु :

  वर :

**शिक्षकांसाठी :** जी बालके शाळा शिक्षण पूर्ण करू शकले नसतील, त्यांना जीवनात पडणाऱ्या समस्यांची चर्चा करा. लग्नासाठी वय मुलींसाठी अठरा वर्ष आणि मुलांसाठी एकवीस वर्ष आहे. त्याची पण चर्चा करा.




# प्रकरण १०

# कबड्डी ... कबड्डी ... कबड्डी ...

कबड्डी ... कबड्डी ... कबड्डी ...

आऊट, आऊट ( एकाबाजूला सर्व मुली मोठ्याने आरोळ्या मारतात. )

कबड्डी ... कबड्डी ... कबड्डी... ( येथून पकडा. )

कबड्डी, कबड्डी ( पाय, पाय, पाय पकडा, तिचा पाय पकडा. )

कबड्डी, कबड्डी ( वसुधा तू इथे ये, तिला तू इथे पकड. )

अरे ! बघ सुशीला तिचा हाथ रेषेला अडणार नाही.

तिचा हात पकड.

कबड्डी, कबड्डी, ओ ! तिने स्पर्श केला, तिने स्पर्श केला

आऊट, आऊट, आऊट सर्व आऊट, हो, हो, हो.

तुमच्या तुकडीतील सर्व आऊट !



या मुली काय करीत आहेत ? त्या आऊट, आऊट, आऊट ओरडत आहेत. त्यावरून स्पष्ट होते की त्या खेळ खेळत आहेत.

या खेळाला तुम्ही काय म्हणतात ? ये हु गु हु, हु तु तु, यू कीट कीट, हा – डु– डु किंवा कबड्डी की काही दुसरे च.

तेव्हा श्यामलाला मुलींनी घेरले आणि पकडून घेतले, सगळ्यांनी विचार केला ती 'आऊट' झाली. कोणी तिचा पाय पकडला आणि कोणी तिचा हात पकडला, तर एका मुलीने तिला कमरेत पकडले, परंतु श्यामला हार मानणाऱ्यां पैकी नव्हती. तिने अधिक ताकद लावून स्वत:ला ओढून आणि मैदानाच्या मध्यभागी असलेल्या रेषेला स्पर्श करण्यात यशस्वी झाली.

जेंव्हा श्यामलाने रेषेला स्पर्श केला तेव्हा समोरील तुकडीतील सर्व मुलींनी तिला पकडलेले होते. त्यामुळे त्या सर्व आऊट झाल्या. परंतु रोझीने दलील केली की श्यामलाने मध्येच श्वास घेतला म्हणून तुकडी आऊट समजली जाणार नाही. श्यामला म्हणाली ते खरे नाही. ती म्हणाली की जर मी श्वास घेतला होता तर मला मुलींनी का पकडून ठेवले ? तेथे मोठी दलील (तक्रार) चालली. शेवटी श्यामलाची गोष्ट मानण्यात आली.

**शिक्षकांसाठी :** या खेळाद्वारे जीवन व्यवहारातील निश्चित नियम आणि त्यांच्या महत्त्वाविषयी चर्चेद्वारे समज द्यावी.

- कबड्डीच्या एका टीममध्ये किती खेळाडू असतात ?

- श्यामलाने मध्यरेषेला स्पर्श केला तेव्हा किती खेळाडू आऊट झाले होते ?

- तुम्ही खेळात असतांना काही विवाद झाला तर तुम्ही काय करतात ?

तर, हा कबड्डीचा खेळ आहे. त्यात ओढाताण होते कोणाला पकडतात, थोड्या आरोळ्या पण मारतात, हा बहादूरीचा खेळ आहे. आणि यात अनेक नियम आहेत. कबड्डीमध्ये डाव घेणारा काय करतो ? कबड्डी कबड्डी असे सतत बोलत राहतो. तो स्वत:च्या भागात परत येतो तोपर्यंत श्वास थांबवून ठेवतो.

तुम्ही डाव घ्यायला जातात तेव्हा लक्षात ठेवा. तुम्हाला शरीराचा उपयोग करायचा आहे.डोळ्याचा पण वापर करायचा आहे.चारी बाजूंना लक्ष द्यावे. तुम्ही समोरील टीमच्या रेषेला स्पर्श करा, त्यावेळी कोणी तुम्हाला पकडणार नाही ते पहावे. किती लक्ष द्यायचे ?

- श्वास रोखून ठेवा. कबड्डी कबड्डी असे बोलत रहा. किती वेळ बोलू शकतात ?

तुम्ही मैदानात जातात तेव्हा कबड्डी खेळतात. तुमचे हात, पाय आणि डोळ्यांवर लक्ष ठेवा. तुमच्या लक्षात येईल की हे सर्व अंग सोबतच काम करतात.



## विचार करा आणि सांगा :

- कबड्डीमध्ये आऊट होणे म्हणजे काय ? कशा कश्याप्रकारे आऊट होतात ?
- कित्येक खेळांमध्ये डाव घेणारा दुसऱ्याला स्पर्श करायला जातो. कित्येक खेळांमध्ये शोधायला जातो. कोण कोणत्या खेळांमध्ये या प्रमाणे होते ?
- तुम्ही दुसरे कोणते खेळ खेळतात ? त्यात डाव घेणाऱ्यास काय करावयाचे असते ?

**शिक्षकांसाठी :** वर बॉक्समध्ये दिलेली प्रवृत्ती फक्त शिक्षकांच्या किंवा वडीलधाऱ्यांच्या निरिक्षण खाली करावी.



## करणम् मल्लेश्वरी



करणम् मल्लेश्वरी वेईट लिफ्टर आहे. (वेईट म्हणजे वजन, लिफ्ट म्हणजे उचलणे) ती आंध्र प्रदेशची आहे. तिचे वडील पोलीसमध्ये आहे. मल्लेश्वरीने वयाच्या बाराव्या वर्षी वजन उचलायला सुरूवात केली होती ती १३० किग्रा वजन उचलू शकते.

मल्लेश्वरीने आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐकोणतीस मॅडल (चंद्रक) जिंकली आहेत. तिच्या चार बहिणी पण वेईट लिफ्टर बनण्याचा प्रयत्न करीत आहेत.



## सरिता गायकवाड

१ जून, १९९४ मध्ये डांग जिल्हयाच्या कराडीआंबा गावी जन्मलेली सरिता लक्ष्मणभाई गायकवाड गुजरातची धावपटू आहे. तिचे आई-वडील शेतीकाम करतात. सरिता ४०० मीटर धावणे आणि ४०० मीटर अडथळयांची शर्यतमध्ये निष्णात आहे. ऐशियन गेम्स-२०१८ मध्ये तीला ४ × ४०० मीटरच्या रीले धावण्यामध्ये सुवर्णचंद्रक मिळाले आहे. वर्तमानात सरिता गायकवाड गुजरात सरकारच्या '**बेटी बचावो**' अभियानाची ब्रान्ड ऐम्बेसेडर पण आहे.

### तीन बहीणींची गोष्ट :



हा फोटोग्राफ पहा. त्या साध्या सरळ आजीबाई सारख्या नाही वाटत ? परंतु त्या विशेष आहेत.

फोटोग्राफ तीन बहिणींचा आहे. ज्वाला, लीला आणि हीरा. त्या मुंबईमध्ये राहतात. त्या तिन्ही कबड्डी खेळत होत्या आणि इतरांना पण शिकवित होत्या. ज्वाला म्हणाली, ''जेव्हा आम्ही तरूण होतो तेव्हा मुलींना हा खेळ खेळण्याची सूट नव्हती. लोक विचार करीत होती की जर मुली असा खेळ खेळतील तर त्यांच्या सोबत कोणी लग्न करणार नाही'' त्यांनी असे पण सांगितले की त्यांना कबड्डी खेळण्यासाठी मुलांचे कपडे घालावे लागत होते. त्यामुळे लोकांनी मुलींना या खेळापासून दूर ठेवले.

जेव्हा त्या लहान होत्या, तेव्हा त्यांचे वडील मृत्यू पावले. त्यांना त्यांची आई आणि मामांनी मोठे केले. दोन्ही मामा कबड्डी आणि खो-खो खेळत होते.त्यांनी या तिन्ही मुलींना कबड्डी खेळण्याची प्रेरणा दिली होती.

ज्वाला आणि लीला त्यांच्या अनुभवा विषयी सांगतात. पन्नास वर्षा अगोदर जेव्हा आम्ही कबड्डी खेळण्याचे सुरू केले, तेव्हा मुलींना हा खेळ खेळण्याची कोणतीही संधी मिळत नव्हती. त्यांचे आई-वडील त्यांना खेळू देत नव्हते, परंतु आम्हाला नेहमी वाटायचे की आम्ही खेळू शकतो. आणि माझ्या मामांनी आणि आईने आम्हाला सहकार्य केले. आम्ही तिघींना हा खेळ शिकलो आणि इतर मुलीपण आमच्या सोबत जुडल्या. आम्ही कबड्डी क्लब बनविला होता. जो आजपण सुरू आहे.

### खूप आठवण येते !

लीला आणि हीराला त्यांच्या गोष्टी आठवण आहेत. त्या सांगतात की हारण्याच्या टोकावर असायचो आणि तरीही जिंकायचो असे अनेक वेळा झाले आहे. एके वेळी मॅच खेळण्यासाठी एक मोठ्या शहरात गेलो. मॅच तर सायंकाळी ६:३० वाजता होती. म्हणून सिनेमा पहायला गेलो. सिनेमा सुरू झाला आणि थोडी धमाल झाली. मामा आम्हाला टॉर्च घेऊन शोधायला आला होता आणि शोधून पण घेतले. शेवटी मामा आम्हाला रागवले.

**शिक्षकांसाठी :** वास्तवात अनेकवेळा मुलींना खेळात समान संधी मिळत नाही. तर या उदारहणाचा उपयोग करून बालकांचे लक्ष वेधावे.





# प्रकरण ११
# मळ्यात

रतन इयत्ता चौथीत शिकते. सुट्यांमध्ये आजोबांसोबत गावाला गेली. आजोबा एके दिवशी सकाळी तिला मळ्यात घेऊन गेले. आजोबा गाय, म्हैंस आणि बैलांना चारा टाकत होते तेवढयात तर रतन मळ्यात आतमध्ये पळाली.

तिने वाडीत विविध फुले, पालेभाज्यांची  रोपे आणि वेल पाहिले. तिने अन्नधान्य–कडधान्याची रोपे आणि उंच उंच वृक्षे पण पाहिली.

कुंडयात उगवलेले गुलाब तर कसे ! माहिती आहे का ? लाल, पिवळे, गुलाबी आणि पांढरे. आणि एका कुंडीत तर वेंत एवढाच वड !

ती तर हे सर्व पाहून दंगच झाली.

आता डोळे बंद करा आणि अनुमान करा की तुम्ही एखाद्या अशाच जागेवर आहात. तर कसे वाटेल ? तेथे तुम्हाला कोणते गीत गायचे मन होईल ?


तुम्ही कधी कोणत्या ठिकाणी विविध प्रकारची फुले एकाच वेळी फुललेले पाहिली आहेत का ? कुठे ?

- तुम्ही वेगवेगळ्या रंगाची किती फुले पाहिली आहेत ? त्यांच्या रंगाची नावे लिहा.

______ ______ ______ ______

______ ______ ______ ______

तुमच्या घरात अशा कोणत्या वस्तू आहेत त्यावर फुलांची नक्षी काढलेली आहे. जसे की, कापड, चादर, फुलदाणी कुंड्या वगैरे ? येथे अशीच एक नक्षी दाखविलेली आहे ती पहा.



हे कच्छच्या लोकांद्वारे भरतगुंफणनी तयार केलेले चाकळाचे चित्र आहे. त्यात फुलांची सुंदर नक्षी खूप बारकाईने करण्यात आली आहे याशिवाय येथे उशीचे कव्हर, काखेतील थैला, थैली वर पण नक्षी तयार केली जाते.

यासारखी नक्षी तुमच्या नोटबुकमध्ये काढा आणि रंग भरा.

जसे रतनने वेगवेगळी फुले पाहिली, तसे तुम्ही पण पाहिली असतील. येथे कित्येक फुलांची चित्रे दिलेली आहेत. ज्या फुलाला तुम्ही ओळखतात त्याच्या समोर (√) निशाणी करा. त्या फुलाचे नाव लिहा.



















वाह ! तुम्ही पण अनेक फुलांना ओळखतात. आता येथे वर दिलेल्या चित्रा शिवायच्या तुम्ही दुसरी जी फुले जाणतात तशा दुसऱ्या दोन फुलांची नावे कोष्टकात लिहा.

मळ्यात

| क्रम | माहिती | फुलाचे नाव | फुलाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | वृक्षावर फुलणारे | | |
| २ | रोपावर फुलणारे | | |
| ३ | वेलावर फुलणारे | | |
| ४ | पाण्यामधील रोपावर फुलणारे | | |
| ५ | रात्रीच्यावेळी फुलणारे | | |
| ६ | दिवसा फुलणारे आणि रात्री मिटणारे | | |
| ७ | सुगंधाने ओळखू शकणारे | | |
| ८ | संपूर्ण वर्ष फुललेले राहते तसे फूल | | |
| ९ | फक्त काही महिन्यांमध्येच फुलणारे फुल | | |

हं... अ.... तुम्हाला तर फार माहिती आहे.तर हे सांगा असे कोणते झाड किंवा रोप आहे ज्याला कधीही फुल येत नाही ? ते शोधा आणि नाव लिहा.

## असे का ?

- तुम्ही कधी कोणत्या ठिकाणी अशी पाटी पाहिली आहे का ?
- ही पाटी तेथे असते तरी लोक फुले तोडतात ?
- लोकं असे का करीत असतील ? विचार करा.
- जर सर्व लोक फुले तोडतील तर काय होईल ?
- त्यांनी असे केले पाहिजे का ?



**चला, जवळून पाहूया :**

बागेत जा. खाली पडलेले असेल असे फूल घेऊन या. या फूलाला काळजीपूर्वक पहा आणि सांगा.

| | |
|---|---|
| • फुलाचा रंग कसा आहे ? | |
| • त्याला सुगंध आहे का ? | |
| • ते कशासारखे दिसते ? (घंटा, वाटी, ब्रश किंवा अन्य सारखे) | |
| • हे फूल गुच्छात आहे का ? | |
| • त्याला किती पाकळ्या आहेत ? | |
| • पाकळ्या जुळलेल्या आहेत की वेगवेगळ्या ? | |
| • पाकळ्यांच्या बाहेर हिरव्या रंगाचा पर्णा सारखा भाग आहे का ? | |
| • पाकळ्यांच्या मध्ये, फुलाच्या मध्यभागी तुम्ही एखादा पातळ भाग पाहू शकतात का ? त्याचा रंग लिहा. | |
| • तुम्ही त्याला स्पर्श केल्यावर रजकण सारखी वस्तू हातावर चिकटते का ? | |

## फुलणाऱ्या कळ्या :



तुम्ही रोपावर फुलणारी कळी पाहिली असेल तुमच्या आसपास पहावयास मिळणाऱ्या रोपा वरील कळ्यांचे अवलोकन करा.

- फुल आणि कळी मध्ये तुम्हाला काय फरक पहावयास मिळतो ?

- कळीला फुलून फूल होण्यास किती दिवस लागतात, हे तुम्ही सांगू शकतात का ?

  चला, प्रयत्न करूया आणि शोधून काढूया.

मळ्यात

- रोपावर उगणारी कळी पसंत करा आणि तिला रोज काळजीपूर्वक पहा.रोपाचे नाव लिहा.

  ____________________

- तुम्ही पहिल्यांदा ही कळी कधी पाहिली ? तारीख ____________________

  कळी फुलून फूल बनले ती तारीख ____________________

  कळीला फूल व्हायला किती दिवस लागले ? ____________________

- तुमच्या मित्रांनी पाहिलेल्या फुलांची नावे विचारा. त्यांच्या कळ्यांना फूल व्हायला किती दिवस लागले ते जाणून घ्या. ____________________

- त्याचप्रमाणे फूल सुकायला किती वेळ लागतो त्याचे पण अवलोकन करा.

- तुमच्या नोटबुकमध्ये कळी आणि त्याच्या फुलाचे चित्र काढा.

## फुलाचे उपयोग !

| क्रम | फुलाचा उपयोग | उदाहरण | अन्य उदाहरण लिहा |
|---|---|---|---|
| १. | आहार म्हणून | गुलकंद | |
| २. | औषध म्हणून | गुलाबजल | |
| ३. | रंग बनविण्यसाठी | पळस (केसूडो) | |
| ४. | गीता मध्ये | पर्वत तुझे पसरट खांब<br>फुलांचा रंग सुगंध<br>तुझा आहे उपहार | |
| ५. | सुशोभनामध्ये | गुलाब | |
| ६. | पूजेमध्ये | | |
| ७. | सुगंधितद्रव्य (अत्तरसाठी) | | |

तुम्हाला समजले ना की फुलांचे किती सर्व उपयोग आहेत ? आता तर ठिकठिकाणी फुलांची शेती पण होते. फुले खूप ठिकाणी उगविण्यात पण येतात. फुलांनी भरलेले शेत मैलांपर्यंत विस्तारलेले असतील असे अनुमान करा. किती सुंदर वाटेल !

**चला, थोडे जास्त जाणूया ....!**

तुम्ही कोणाला फुले विकतांना पाहिले आहे का ? जर तुमच्या आसपास कोणी फुले विकणारे असतील तर त्यांना हे प्रश्न विचारा आणि लिहा.

- ते कोणकोणती फुले विकतात ?

  ________ ________ ________

- ते ही फुले कुठून आणतात ?

  ________

- लोकं फुले कशासाठी खरेदी करतात ?

  ________

  ________

- फुल विकणारे फुले कोणत्या रूपात विकतात ? ही चित्रे पहा. तुम्ही पाहिलेल्या फुलाच्या रूपा समोर (√) ची निशानी करा.













- याशिवाय फुलांचे कोणते दुसरे रूप तुम्ही पाहिले आहे का ?

- कित्येक फुलांचा वेग-वेगळ्या रूपात उपयोग होतो. जसे की गुलाब आणि झेंडू हार बनविण्यासाठी उपयोगी आहे आणि सुटया पाकळ्या पण वापरल्या जातात.

- या वेगवेगळ्या रूपातील फुलांची किंमत शोधून काढा.

एक फूल ______

एक हार ______

एक पुष्पगुच्छ ______

- फुल विकणारे पुष्पगुच्छ किंवा फुलांची जाळी कोणाजवळून बनविण्यास शिकले आहेत का ? कोणाजवळून ?

- त्यांच्या कुटुंबातील इतर कोणी सदस्य हे काम करतील असे ते इच्छितात का ? का ?

## चला, प्रवृत्ती करू या :

- चारपाच मित्रांचा एक गट बनवून प्रवृत्ती करा.
- वृक्ष किंवा रोपावरून पडलेले फूल वर्गात आणा.
- ही फुले जून्या वर्तमानपत्रात एकमेकांना स्पर्श करणार नाही त्या रितीने पसरवा.
- आता, वर्तमानपत्रावर वजन ठेवा.

- फुले सुकतील तोपर्यंत दाबून ठेवा.
- त्यानंतर सर्व फुले काळजी घेऊन एकत्र करा. स्क्रेपबुक तयार करा.
- तुम्ही या सुकलेल्या फुलांचा सुंदर कार्ड बनविण्यासाठी पण उपयोग करू शकतात.

रतन तर वाडीत पुढे पुढे चालतच जात आहे. शेतातील एका कोपऱ्यात तिने काही माणसांना एका वाफ्या मध्ये गवत साफ करतांना पाहिले. तिने पण तेथे जाऊन गवत उपटण्याचे सुरू केले.

काय झाले माहित आहे ? तिचे नाजूक हात गवत उपटल्यामुळे लाल झाले. तेथे गवत उपटल्यामुळे कित्येक मूळ पण उपटले गेले.



- तुम्ही सांगू शकतात का सर्वच रोपांना मूळे असतात का ?
- तुमच्या आजुबाजूला थोडे वृक्ष आणि रोपे पहा. त्यांची मूळे किती खोल आणि पसरलेले आहेत ? अनुमान करा.

तेथे रतनने पाहिले, रामजीभाई मूळा उपटून बाहेर काढत होते. रतनने रामजीभाईना विचारले तर ते म्हणाले, ''बेटा, हा मूळा आहे आणि ते पण एक मूळच आहे.''तेथे अचानक एकदम पावसाला सुरवात झाली. जोरदार वाऱ्यासोबत पाऊस असून सुद्धा शेताच्या किनारी उभे असलेले वृक्ष न डगमगता उभे होते.

- जोरदार वारा असून सुद्धा झाड का पडले नाही ? अनुमान करा.
- उगणाऱ्या लहान रोपाला पाणी मिळाल्यावर त्याची सुकलेली पाने पुन्हा ताजी का होऊन जात असतील ?

- तुमच्या आसपास कोणत्या रोपाला नियमित पाणी द्यावे लागते ?

रतनला समजले की तिच्या घरासमोरील उगलेल्या मोठ्या कडूलिंबाच्या झाडाला तिने खूप दिवसांपासून पाणी दिले नाही तिने विचार केला, तर ते कडूलिंबाचे झाड पाणी कुठून मिळवित असेल ?

- तुमच्या जवळपासच्या कोणत्या वृक्षांना नियमित पाण्याची आवश्यकता नाही. ते पाणी कुठून मिळवितात ?

- खाली दिलेले पाले भाज्यांची चित्रे पहा आणि त्या पैकी कोणते मूळ आहे ते शोधा.

रतनला आता रोपांविषयी जास्तीत जास्त प्रश्न पडू लागले.



तिने शाळेच्या भिंतीमधून रोपाला उगतांना पाहिले. तिला आश्चर्य वाटले. तिने विचार केला .....

- या रोपाची मूळे किती खोल जात असतील ?
- मूळांना पाणी कशा रितीने मिळत असेल ?

- ही रोपे किती मोठे होत असतील ?
- या भिंतीचे काय होत असेल ?
- चित्रात दिलेल्या रोपाचे नाव तुम्ही सांगू शकतात का ?

तुम्ही अशा प्रकारे भिंतीच्या तिराडीमधून रोप उगतांना पाहिले आहे का ? कुठे पाहिले आहे ? तुम्हाला कोण कोणती प्रश्न पडलीत ? प्रश्नांची उत्तरे तुमच्या वडिलधाऱ्यांजवळून विचारून नोंदा.



रतनने शेताच्या बांधावर एक मोठे झाड रोडवर पडलेले पाहिले. तिला तिच्या शाळेतील कडूलिंबाचे झाड आठवले. बांधवर पडलेल्या वृक्षाची थोडी तुटलेली मूळे ती पाहू शकत होती. तिने विचार केला.

- या वृक्षाला कोणी उपटले असेल का, ते स्वत:च पडले असेल ?
- हे झाड किती जूने असेल ?
- बांधवरील दगडांच्या मधून हे झाड पाणी कुठून मिळवत असेल ?

## चला, गोष्ट करूया :

- तुमच्या विस्तारात कोणती वृक्ष जूनी आहेत ? ती किती जूनी आहेत ? तुमच्या वडिलधाऱ्यांकडून जाणून घ्या.
- या वृक्षावर रहाणाऱ्या प्राण्यांची नावे लिहा.

- तुम्ही एखाद्या मोठ्या वृक्षाला खाली पडलेले पाहिले आहे का ? तुम्ही ते पाहिल्यावर काय विचार केला ?